जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२२ दिनांक: १२ ऑक्टोबर, २०२२

जळगाव दि. १२ (प्रतिनिधी ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या मानसशास्त्र विभागात जागतिक मानसिक आरोग्य दिनानिमित्त विद्यापीठस्तरीय भित्तीपत्रक सादरीकरण स्पर्धा आणि मानसोपचार तज्ज्ञ डॉ. प्रदीप जोशी यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले.

मानसिक आरोग्यावर आधारित पोस्टर स्पर्धेची पारितोषिके वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता प्रा. अनिल डोंगरे व कला व मानवविद्या प्रशाळेचे संचालक डॉ.अनिल चिकाटे यांचे हस्ते देण्यात आले. प्रथम पारितोषिक रु.३०००/- धुळे येथील जयहिंद महाविद्यालयाच्या मोक्षदा वसावे व योगेश खारतोडे यांना मिळाले. व्दितीय पारितोषिक रु.२०००/- प्रशाळेच्या मानसशास्त्र विभागातील उमेश राठोड व रोहन पगारे यांना तर तृतीय पारितोषिक रु.१०००/- जयहिंद महाविद्यालयातील प्रेरणा वाधवानी व हर्षल राठोड यांना मिळाले. उत्तजनार्थ पारितोषिक रु.५००/- प्रत्येकी एरंडोल महाविद्यालयातील कोमल पाटील, नेहा पाटील आणि मु.जे.महाविद्यायातील वैष्णवी पाटील यांना देण्यात आले. परिक्षक म्हणून मानसशास्त्रज्ञ संगीता संघवी व मानसशास्त्रज्ञ संध्या पाटील यांनी काम पाहिले.या स्पर्धेत प्रशाळा व महाविद्यालयातील ६८ विद्यार्थी व विद्यार्थिनींनी सहभाग घेतला. आदित्य पाटील याने प्रथम क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त केले.

व्याख्यानसत्रात मानसिक आरोग्य : काळाची गरज या विषयावर मानसोपचार तज्ज्ञ डॉ. प्रदीप जोशी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. डॉ. वीणा महाजन यांनी समन्वयक तर डॉ.अनिलसिंग तौर यांनी विशेष सहकार्य केले. सूत्रसंचालन डॉ.सीमा बारी यांनी तर आभार प्रदर्शन कल्पेश पवार या विद्यार्थ्याने मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ.तुषार रायसिंग, डॉ.सुभान जाधव, डॉ.रेखा साळुंखे, पंकज शिंपी आणि कुंदन ठाकरे यांनी परिश्रम घेतले.

बातमी क्र.२

जळगाव दि.१२ ( प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या बहि:स्थ शिक्षण आणि अध्ययन विभागाव्दारे शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीता एम.ए. (मराठी, हिंदी, इंग्रजी, समाजशास्त्र, इतिहास, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, संरक्षण व सामरिकशास्त्र, शिक्षणशास्त्र) आणि एम.कॉम. या पदव्युत्तर शिक्षणक्रमांच्या ऑनलाईन प्रवेशासाठी ३१ऑक्टोबर पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे अशी माहिती विभागाचे संचालक प्रा.आशुतोष पाटील यांनी दिली आहे.

**बातमी क्र.३**

जळगाव दि.१२ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्र आणि विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार दि.१२ ऑक्टोबर रोजी संहिता लेखन कार्यशाळा घेण्यात आली.

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक प्रा.दीपक दलाल यांच्या हस्ते उदघाटन झाले. बीजभाषक म्हणून आकाशवाणी जळगाव केंद्राचे अधिकारी सुधीर ओखदे व मार्गदर्शक म्हणून आकाशवाणी केंद्राचे निवेदक स्मिता दीक्षित, सतीश पप्पू उपस्थित होते. संयोजक व प्रशाळेच्या संचालक प्रा.मुक्ता महाजन यांची उपस्थिती होती. सुधीर ओखदे यांनी संहिता लेखनासाठी वाचन महत्वाचे असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.दीपक खरात यांनी केले.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

**बातमी क्र.४**

जळगाव, दि.१२ (प्रतिनिधी)- शिक्षण क्षेत्रात फार मोठे आमुलाग्र बदल होत आहे. नवीन शैक्षणिक धोरणांमध्ये कौशल्याधिष्ठीत अभ्यासक्रमावर भर देण्यात आल्याने विद्यार्थ्यांना करिअरच्या संधी व्यापक प्रमाणात उपलब्ध होत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी परिश्रम करणे आवश्यक आहे, असे मत कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे प्र -कुलगुरू प्रा.एस.टी.इंगळे यांनी व्यक्त केले.

विद्यापीठाच्या जनसंवाद आणि पत्रकारिता विभागाला चाळीसगाव येथील नानासाहेब वाय.एस.चव्हाण महाविद्यालयातील राज्यशास्त्र अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी १२ ऑक्टोबर रोजी भेट देवून विभागाविषयी माहिती जाणून घेतली. त्यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. यावेळी मानव्यविद्या शाखेचे प्रभारी अधिष्ठाता प्राचार्य डॉ. प्रमोद पवार, चाळीसगाव येथील प्रा. आर.पी.निकम, प्रा. रवी चव्हाण, पत्रकारिता विभागाचे प्रमुख डॉ. सुधीर भटकर, डॉ.विनोद निताळे, डॉ.गोपी सोरडे, डॉ.सोमनाथ वडनेरे उपस्थित होते. अधिष्ठाता प्रा.डॉ. प्रमोद पवार यांनी मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक धोरणांविषयी सविस्तर माहिती दिली. विभागप्रमुख प्रा.डॉ.सुधीर भटकर यांनी विद्यापीठ आणि विभागाच्या कामकाजाविषयी माहिती दिली. यावेळी महाविद्यालयाचा विद्यार्थी आकाश गोसावी व कस्तुरी जगताप हिने प्रातिनिधिक स्वरुपात मनोगत व्यक्त केले.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी